




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

रविवार, दि. २७ एप्रिल २०२५








मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ३ रे | अंक : १९२ | किंमत : ४.०० रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com

Editor : Dr. Vishwasrao Anandrao Arote | Registration no. MAHMAR/2021/82132 | Pages : 4 | Year : 3rd | Issue : 192 | Amount : 4 Rs/- | Gmail : punegavkari@gmail.com


## सिंहासन




# पहलगामचा बदला? भारताने झेलममध्ये पाणी सोडलं?

## पाकिस्तानात महापूर; आणीबाणी जाहीर

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

जम्मू काश्मीरच्या पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमध्ये तणाव निर्माण झाला आहे. भारताने पाकिस्तानला दोन्ही देशांमधून वाहणाऱ्या नद्यांचं पाणी रोखण्याचा इशारा दिला आहे. अशातच पाकिस्तानमधील नद्यांना पूर आला आहे. यावरून पाकिस्तानी प्रसारमाध्यमांनी थेट भारतावर आरोप केला आहे की भारताने अचानक झेलम नदीत पाणी सोडल्यामुळे पाकिस्तानमध्ये पूर आला आहे. दरम्यान, पाकिस्तानच्या मुजफ्फराबादमध्ये आणीबाणी घोषित करण्यात आली आहे. पाकिस्तानी माध्यमांनी म्हटलं आहे की भारताने पाकिस्तानी अधिकाऱ्यांना कुठल्याही प्रकारची माहिती न देता अचनाक झेलम नदीत पाणी सोडल्यामुळेच ही परिस्थिती उद्भवली आहे.

पाकिस्तानी माध्यमांनी केलेल्या दाव्यांनुसार भारताने झेलम नदीत पाणी सोडल्यामुळे मुजफ्फराबाद व आसपासच्या भागातील पाण्याचा स्तर वाढला. नद्यांमधील पाण्याची पातळी वाढून पूर आला आहे. स्थानिक प्रशासनाने हट्टियन बालामध्ये 'जल आणीबाणी' जाहीर केली आहे. मशिदींमधून लोकांना सूचना दिल्या जात आहेत. उत्तर काश्मीरमधील बारामुल्लाह जिल्ह्यातून पाणी पाकव्याप्त काश्मीर आणि पाठोपाठ मुजफ्फराबादमध्ये शिरलं. परिणामी उत्तर पाकिस्तानात पूर आला आहे. भारताने सिंधू जलकरार स्थगित करण्याचा इशारा दिल्यानंतर ही घटना घडली आहे.



भारत सरकारने शनिवारी सिंदू जलकरार स्थगित करण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी औपचारिक अधिसूचना जारी केली आहे आणि गुरुवारी ही अधिसूचना पाकिस्तानला सोपवली. या अधिसूचनेत म्हटलं आहे की "आम्ही सिंधू जलकरार स्थगित करत आहोत." त्यामुळे सिंधू नदीतील पाण्याशी संबंधित वेगवेगळ्या विभागांच्या आयुक्तांमधील बैठका, उभय देशांमधील माहितीचं आदान-प्रदान व नवीन प्रकल्पांची आगाऊ सूचना यासह करारातील इतर जबाबदाऱ्या निलंबित करण्यात आल्या आहेत. हा करार स्थगित केल्यामुळे भारत आता पाकिस्तानच्या परवानगीशिवाय किंवा त्यांच्याशी सल्लामसलत न करता नदीवर धरणे बांधण्यास मोकळा आहे. तसेच भारत आपल्या नद्यांचं पाणी अडवू शकतो, धरणांमधील पाणी वाट्टेल तेव्हा नदीत पाणी सोडू शकतो.

पाकिस्तानी अधिकाऱ्यांना भारताने एक पत्र पाठवलं आहे.

या पत्रात भारताचे जलसंपदा सचिव देबश्री मुखर्जी यांनी म्हटलं आहे की जम्मू व काश्मीरला लक्ष्य करत पाकिस्ताकडून सातत्याने सीमा ओलांडून दहशतवादी कारवाया चालू आहेत. यामुळे सिंधू जलकरारांतर्गत भारताच्या अधिकारांवर गदा येत आहे.

## थोडक्यात...



### जगातील हवामान शास्त्रज्ञ चिंतेत

मुंबई (समर्थ गांवकरी) : पुढील तीन महिन्यांत जगभरात तापमानातील वाढ अधिक तीव्र होणार असल्याचा अंदाज जागतिक हवामानशास्त्र संघटनेने वर्तवला आहे. उत्तर दक्षिण प्रशांत, पूर्व आशिया आणि अरब या भागातही उष्णता उच्चांक गाठण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. मे ते जुलै 2025 या कालावधीत जगातील बहुतांश भागात पारा वाढू शकतो असा अंदाज जागतिक हवामानशास्त्र संघटनेने व्यक्त केला आहे. सध्या तापमानवाढ हा हवामानतज्ज्ञ, अभ्यासक यांच्या चिंतेचा विषय झाला आहे. वाढत्या उष्णतेचे परिणाम मानवी आरोग्य तसेच शेतीवर होत आहेत. त्याचबरोबर तापमानवाढीतील उच्चांकही दिवसेंदिवस विविध भागात नोंदवले जात आहेत. भारताच्या काही भागांत मे ते जुलै या कालावधीत तापमान अधिक राहील. त्यामुळे वाढणारी उष्णताही असह्य असेल. तसेच पावसाच्या वेळापत्रकात बदल होण्याची शक्यता आहे. या तीन महिन्यांत सर्वाधिक पावसाचा अंदाज जागतिक हवामानशास्त्र संघटनेने व्यक्त केला आहे.

### पोप फ्रान्सिस यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार

मुंबई (समर्थ गांवकरी) : पोप फ्रान्सिस यांच्या पार्थिवावर रोममधील सेंट मेरी मेजर बॅसिलिका येथे शनिवारी साधेपणाने अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यासाठी कुमारी मेरीच्या 'सॅलस पोपुली रोमानी' प्रतिमेजवळ एक साधी समाधी बांधण्यात आली. अंत्यविधीला वरिष्ठ कार्डिनल आणि पोप यांचे निकटवर्तीय उपस्थित होते. त्यापूर्वी व्हॅटिकन सिटीमधील सेंट पीटर्स चौकामध्ये विविध राष्ट्रप्रमुख आणि सर्वसामान्य भाविकांनी त्यांचे अंत्यदर्शन घेतले. पोप फ्रान्सिस यांचे 21 एप्रिलला निधन झाल्यानंतर व्हॅटिकनचा कारभार पाहणारे कार्डिनल केविन फारेल यांनी अखेरचे विधी पार पाडले. पोप फ्रान्सिस यांच्या साध्या लाकडी शवपेटिकेचे दफन करण्यापूर्वी कार्डिन फारेल यांनीती सील केली. पोप फ्रान्सिस यांची भक्ती मदर मेरीप्रति समर्पित होती. त्यांच्या इच्छेनुसार सेंट मेरी मेजर बॅसिलिका येथे अंत्यविधी झाला. पोप फ्रान्सिस यांचे पार्थिव अंत्यदर्शनासाठी बुधवारपासून ठेवण्यात आले होते. त्यासाठी जगाच्या कानाकोपऱ्यातून अखेरच्या क्षणापर्यंत भाविक येत होते. अखेरच्या दिवशीही सेंट पीटर्स चौक भाविकांनी भरला होता. यावेळी उपस्थितांनी अखेरपर्यंत सर्वाधिक वंचितांचा विचार करणारे पोप म्हणून त्यांचे स्मरण केले.

# मुंबई इंडियन्ससमोर आज लखनऊ सुपर जायंट्सचे आव्हान

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

खराब सुरुवातीनंतर जोरदार पुनरागमन करणाऱ्या मुंबई इंडियन्स संघासमोर इंडियन प्रीमियर लीगच्या (आयपीएल) रविवारी होणाऱ्या सामन्यात लखनऊ सुपर जायंट्स संघाचे आव्हान असेल. या वेळी मुंबईचा प्रयत्न आपली विजयी लय कायम राखण्याचा असेल. या दोन्ही संघांचे आतापर्यंत समान १० गुण आहेत. चांगल्या निव्वळ धावगतीच्या आधारे मुंबई ही गुणतालिकेत लखनऊच्या पुढे आहे. दोन्ही संघांनी नऊपैकी पाच सामने जिंकले आहेत. ऋषभ पंतच्या नेतृत्वाखालील लखनऊ संघाचा प्रयत्न विजय मिळवण्यासह आपली निव्वळ धावगती सुधारण्याचा असेल. या हंगामाच्या साखळी फेरीतील काहीच सामने आता शिल्लक असून सर्व संघांसाठी निव्वळ धावगती महत्त्वपूर्ण ठरणार आहे. हे दोन्ही संघ मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर एकमेकांसमोर येतील. तेव्हा मुंबईच्या उष्ण व दमट वातावरणाचा सामना खेळाडूंना करावा लागेल. त्यामुळे प्रतिकूल परिस्थितीत खेळाडूंना सर्वोत्तम कामगिरी करावी लागेल. लखनऊसाठी कर्णधार ऋषभ पंतची खराब लय चिंतेचा विषय आहे. कारण, त्याने आतापर्यंत खेळलेल्या नऊ सामन्यांत केवळ १०६ धावा केल्या आहे. त्यामुळे मुंबईच्या भक्कम गोलंदाजी माऱ्यासमोर त्याचा चांगला कस लागेल.

# प्रेमविवाह केल्याने मुलीची निवृत्त जवानाकडून गोळी झाडून हत्या

**जळगाव : (समर्थ गांवकरी)**

जिल्ह्यातील चोपडा शहरात प्रेमविवाह केल्याच्या रागातून केंद्रीय राखीव पोलीस दलातील निवृत्त जवानाने मुलीसह तिच्या पतीवर गोळीबार केला. शनिवारी रात्री ही घटना घडली. त्यात मुलीचा जागीच मृत्यू झाला. तर, तिचा पती गंभीर जखमी आहे. गोळीबार करणाऱ्या निवृत्त जवानाला नागरिकांनी चोप दिल्यामुळे तो देखील गंभीर जखमी झाला आहे. सासरा आणि जावई दोघांना जळगाव येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. तृप्ती वाघ (२४) हिने वडिलांच्या इच्छेविरूद्ध अविनाश वाघ (२८, रा. करवंद, ता.शिरपूर, हल्ली मुक्काम, कोथरूड, पुणे) याच्याशी दोन वर्षांपूर्वी प्रेमविवाह केला होता.



त्यामुळे तृप्तीचे वडील किरण मंगळे ((४८, रा.रोहिणी, ता.शिरपूर) हे संतप्त होते. चोपडा शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगरात शनिवारी सायंकाळी अविनाशच्या बहिणीच्या हळदीचा कार्यक्रम होता. त्याठिकाणी तृप्ती आणि अविनाश हे दोघे पुण्याहून आले होते. तीच संधी साधून तृप्तीचे वडील किरण मंगळे यांनी रात्री दहाच्या सुमारास आधी तृप्ती आणि त्यानंतर अविनाशवर अगदी जवळून गोळ्या झाडल्या. तृप्तीचा जागीच मृत्यू झाला. अविनाशच्या पाठीत आणि हाताला गोळी लागली आहे.

अचानक गोळीबार झाल्याने हळदीच्या कार्यक्रमाला जमलेले सर्व वऱ्हाडी सैरभैर झाले. जवळच्या नातेवाईकांनी तृप्ती आणि अविनाश यांना रक्ताच्या थारोळ्यात पडल्याचे पाहुन गोळीबार करणारा अर्जुन मंगळे यास पकडून बेदम मार दिला. त्यामुळे तो गंभीर जखमी झाला.

घटनेची माहिती मिळताच चोपडा शहर पोलिसांनी धाव घेतली. जिल्हा पोलीस अधीक्षक महेश्वर रेड्डी यांनी तातडीने घटनास्थळी भेट दिली. तृप्तीचा मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी रात्री उशिरा उपजिल्हा रुग्णालयात रवाना करण्यात आला. तसेच गंभीर जखमी अवस्थेतील अविनाश आणि किरण यांना जळगाव येथे हलविण्यात आले.

# ३८ वर्षांपासून भारतात राहणाऱ्या शारदाबाईंना देश सोडण्याची नोटीस

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तान विरोधात कठोर पाऊले उचण्यास सुरुवात केली आहे. याचाच भाग म्हणून केंद्र सरकारने पाकिस्तानी नागरिकांना दिले जाणारे व्हिसा रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाचा फटका बसलेल्यांमध्ये पाकिस्तानी वंशाच्या ५५ वर्षीय शारदाबाई यांचाही समावेश आहे. त्यांचे लग्न एका भारतीय नागरिकाशी झाले असून, गेल्या ३८ वर्षांपासून त्या ओडिशामध्ये राहत आहेत.



शारदाबाई, लग्नानंतरच्या शारदा कुकरेजा यांचा जन्म १९७० मध्ये पाकिस्तानच्या सिंध प्रांतातील सुक्कुर शहरात झाला होता, असे त्यांच्या पाकिस्तानी पासपोर्टवरून दिसून येते. जिल्हा पोलिसांनी त्यांना भारत सोडण्याची नोटीस पाठवली आहे. यामध्ये म्हटले आहे की, शारदाबाई यांच्याकडे भारताचा दीर्घकालीन व्हिसा नाही किंवा त्या सूट दिलेल्या श्रेणींमध्येही येत नाहीत. त्यांनी दिलेल्या मुदतीत भारत सोडला नाही तर, त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याचा इशारा पोलिसांनी दिला आहे.

शारदाबाई म्हणाल्या की, त्यांचे वडील १९८७ मध्ये त्यांच्या सहा मुलांसह ६० दिवसांच्या व्हिसावर भारतात आले आणि ओडिशाच्या कोरापूट जिल्ह्यात स्थायिक झाले.सुमारे ३५ वर्षांपूर्वी शारदाबाई यांचे लग्न बोलांगीर येथील एका व्यावसायिकाशी झाले आहे. त्यांना आता एक मुलगा, एक मुलगी आणि दोन नातवंडे आहेत, जे भारतीय नागरिक आहेत. मतदार ओळखपत्र आणि आधार कार्ड असल्याचा दावा करणाऱ्या शारदाबाई म्हणाल्या की, त्यांनी भारतीय नागरिकत्वासाठी खूप वर्षांपूर्वी अर्ज केला होता परंतु त्यांना आतापर्यंत भारतीय नागरिकत्व मिळू शकले नाही.

बोलंगीरच्या पोलीस अधीक्षकांनी शनिवारी जारी केलेल्या पत्रात म्हटले आहे की, "आमच्या उपलब्ध नोंदीनुसार, तुमच्याकडे वैध दीर्घकालीन व्हिसा नाही आणि तुम्ही सवलतीच्या श्रेणीतील व्हिसामध्येही येत नाही. त्यामुळे तुम्हाला लवकरात लवकर भारत सोडण्याचे निर्देश देण्यात येत आहेत, अन्यथा तुमच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई केली जाईल."

### कुटुंबापासून वेगळे करू नका

पत्रकारांशी बोलताना शारदाबाईंनी सरकारला विनंती केली की, त्यांना त्यांच्या कुटुंबापासून वेगळे करू नये. पाकिस्तानात त्यांचे कोणीही नाही. "मी इथे आल्यापासून मी भारताला माझा देश मानला आहे. माझे कुटुंब भारतात आहे. त्यामुळे मला पाकिस्तानात जायचे नाही. मी कधीही पाकिस्तानातील कोणाशीही बोलले नाही, अगदी फोनवरही." याबाबत इंडियन एक्सप्रेसने वृत्त दिले आहे.

# पंचायत निवडणुकीतील उमेदवारांना सर्वोच्च न्यायालयाचा आदेश

**नवी दिल्ली: (समर्थ गांवकरी)**

पंचायत निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी त्यांच्यावरील प्रलंबित खटल्यांची माहिती जाहीर करणे बंधनकारक असल्याचा हिमाचल प्रदेश उच्च न्यायालयाचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने कायम ठेवला आहे.न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती एन. कोटीश्वर सिंह यांच्या खंडपीठाने हिमाचल प्रदेश उच्च न्यायालयाचा मंडी जिल्ह्यातील पांगना ग्रामपंचायतीच्या प्रमुखाच्या बडतर्फीचा हिमाचल प्रदेश उच्च न्यायालयाचा निर्णय कायम ठेवताना ही टिप्पणी केली. यापूर्वी १६ ऑक्टोबर २०२४ रोजी उच्च न्यायालयाने आपल्या निकालात 'तथ्ये लपवणे हे हिमाचल प्रदेश पंचायती राज कायदा, १९९४ च्या तरतुदींचे उल्लंघन असल्याचे व निवडणूक बेकायदेशीर घोषित करण्यासाठी एक कायदेशीर कारण असू शकते', अशी टिप्पणी केली होती. कोणत्याही परिस्थितीत याचिकाकर्ते बसंत लाल यांच्याविरुद्ध गैरवर्तनाचा आरोप निश्चित करण्यासाठी कायद्यातील कोणत्याही तरतुदी, नियम किंवा नियमांचा संदर्भ घेण्याची आवश्यकता नाही. हे एक प्रकरण आहे ज्यात त्याने जाणीवपूर्वक खोटे प्रतिज्ञापत्र / हमीपत्र दाखल केले आणि त्याच्याविरुद्ध फौजदारी खटला प्रलंबित असल्याची वस्तुस्थिती लपवून ठेवली. ही वस्तुस्थिती लपविणे ही निवडणूक रद्द करण्याचे वैध कारण होते, असे खंडपीठाने स्पष्ट केले.

# युवकांसाठी रोजगारवाढीच्या संधि; पंतप्रधानांच्या हस्ते 51 हजार नियुक्तिपत्रांचे वाटप

**नवी दिल्ली : (समर्थ गांवकरी)**

रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधी वाढत राहण्यासाठी केंद्र सरकार पावले उचलत असल्याचे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले. केंद्र सरकारच्या विविध विभागांमधील ५१ हजारहून अधिक रिक्त पदांना नियुक्तिपत्रांचे वाटप केल्यानंतर रोजगार मेळाव्याच्या १५व्या आवृत्तीला ते दूरदृश्य प्रणालीद्वारे संबोधित करीत होते.

हा तरुणांसाठी अभूतपूर्व संधीचा काळ असल्याचे ते म्हणाले. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (आयएमएफ) च्या अहवालाचा दाखला देत भारत सर्वात वेगाने वाढणारी प्रमुख अर्थव्यवस्था राहणार असून प्रत्येक क्षेत्रात रोजगाराच्या संधी वाढणार असल्याचे ते म्हणाले. वाहन आणि पादत्राणे उद्योगातील उत्पादन आणि निर्यातीने नवे विक्रम प्रस्थापित केले आहेत, ज्यामुळे मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण झाला असल्याची माहितीदेखील पंतप्रधानांनी या वेळी दिली.



२०१४ पूर्वी आंतर्देशीय जलमार्ग वाहतूक १८ दशलक्ष टन होती ती आज १४५ दशलक्ष टनापर्यंत वाढली असल्याचे व राष्ट्रीय राष्ट्रीय जलमार्गांची संख्या ५वरून ११०पर्यंत वाढली असून त्यांची लांबी २७०० कि.मी. वरून ५००० कि.मी.पेक्षा जास्त झाली असल्याचे पंतप्रधानांनी सांगितले.

विकास सर्वसमावेशक झाला असून प्रत्येक क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढला असल्याचेदेखील पंतप्रधानांनी अधोरेखित केले. यंदाच्या यूपीएससी परीक्षेतील पाच अव्वलमध्ये तीन महिलांचा समावेश असल्याचा उल्लेखदेखील त्यांनी केला. ते म्हणाले की ९० लाखांहून अधिक बचत गटांमध्ये १० कोटींहून अधिक महिला काम करत आहेत.

नोकरशाहीपासून ते अवकाश आणि विज्ञानापर्यंतच्या क्षेत्रात भारताची महिला शक्ती शिखर गाठत आहे आणि सरकार ग्रामीण महिलांच्या सक्षमीकरणावरही भर देत असल्याचे पंतप्रधान म्हणाले.या वेळी त्यांनी 'व्हेव्ह्ज' परिषदेचा उल्लेखदेखील केला.

> या दशकात तरुणांनी भारताच्या तंत्रज्ञान, विदा आणि नावीन्यपूर्ण विकासाला चालना दिली आहे. डिजिटल व्यवहारांमध्ये देश अग्रेसर आहे. जेव्हा तरुण राष्ट्र उभारणीसाठी सक्रियपणे योगदान देतात तेव्हा देशाला वेगवान विकासाचा अनुभव येतो आणि जागतिक व्यासपीठावर ओळख मिळते. देशातील तरुणांसाठी रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधी सतत वाढत राहतील याची काळजी केंद्र सरकार प्रत्येक टप्प्यावर घेत आहे.
>
> **– नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

**'व्हेव्ह्ज' परिषदेचा उल्लेख**

- स्किल इंडिया, स्टार्टअप इंडिया आणि डिजिटल इंडिया यांसारख्या उपक्रमांमध्ये तरुणांसाठी नवीन संधी निर्माण होत असून त्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी खुले व्यासपीठ उपलब्ध करून दिले जात आहे.
- समर्पण आणि कल्पकतेद्वारे भारतातील तरुण देशामध्ये असलेली अफाट क्षमता जगाला दाखवत आहेत.
- मुंबईत होणारी वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल अँड एंटरटेनमेंट समिट (व्हेव्ह्ज) ही तरुणांसाठी जागतिक व्यासपीठावर आपली कौशल्ये सादर करण्याची उत्तम संधी असेल.
- 'उत्पादन मोहीम' देशभरातील लाखो सूक्ष्म, लघु उद्योग आणि लहान उद्योजकांना केवळ पाठिंबाच देणारी नाही तर देशभरात रोजगाराच्या नव्या संधीही निर्माण करतील.



## आदिवासी उन्नती सेवा मंडळाचे विश्वस्त

अमृतसागर दूध संघाचे चेअरमन, महानंद दुध संघ मुंबईचे संचालक,
अकोले तालुका एज्युकेशन संस्थेचे कायम विश्वस्त, मा.विधानसभा सदस्य

## मा.आ.श्री.वैभवराव पिचड

यांना वाढदिवसानिमित्त

**हार्दिक शुभेच्छा**



# आदिवासी उन्नती सेवा मंडळ, राजूर

## ता.अकोले, जि.अहमदनगर

संस्थापक विश्वस्त : स्व. श्री. मधुकरराव पिचड

विश्वस्त : मा.आ.वैभवराव पिचड



अध्यक्ष : श्री.भरत नामदेव घाणे

सचिव : श्री.एम.एम.भवारी



- संचालक -

श्री.विठ्ठल तबाजी भवारी,श्री.माधव भाऊ गभाले,
श्री.भरत रामजी घोरपडे, श्री.पांडुरंग आनंदा खाडे, श्री.गणपत शंकर भांगरे,
श्री.सुनिल महादु सारोक्ते, श्री.मारुती यशवंत मेचकर, श्री.चिंधु भाऊ भांगरे

## आदिवासी उन्नती मंडळ संचलित...

**प्राथ. व माध्य.व उच्च माध्यमिक आश्रमशाळा, मान्हेरे**
मुख्याध्यापक
श्री.बोऱ्हाडे एस.टी. (प्राथ)
श्री.पिचड डी.आर.(माध्य))
अधिक्षक, शिक्षक व कर्मचारी

**प्राथमिक आश्रमशाळा,राजुर**
ता.अकोले, जि.अहमदनगर
मुख्याध्यापक
श्री.शिरीष पाबळे (प्राथ)
अधिक्षक, शिक्षक व कर्मचारी

**प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा, देवठाण**
ता.अकोले, जि.अहमदनगर
मुख्याध्यापक
श्रीमती पाटील एम.टी. (प्राथ)
श्री.भांगरे एस.एम.(माध्य)
अधिक्षक, शिक्षक व कर्मचारी

**प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा, एकदरे**
ता.अकोले, जि.अहमदनगर
मुख्याध्यापक
श्री.नेहे पी.बी. (प्राथ)
श्री.आरोटे डी.व्ही.(माध्य)
अधिक्षक, शिक्षक व कर्मचारी

**प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा, शेंडी**
ता.अकोले, जि.अहमदनगर
मुख्याध्यापक
श्री.तातळे एम.एल. (प्राथ)
श्री.भालेराव ए.जी. (माध्य)
अधिक्षक, शिक्षक व कर्मचारी

**प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा,खडकी**
ता.अकोले, जि.अहमदनगर
मुख्याध्यापक
श्री. अशोक नाईकवाडी (प्राथ)
श्री.सदगीर एस.एन.(माध्य))
अधिक्षक, शिक्षक व कर्मचारी

**आदिवासी उन्नती सेवा मंडळ कर्मचारी पतसंस्था; राजूर**
चेअरमन : श्री.सुधीर कानवडे
व्हा.चेअरमन :श्री.रामदास बांबळे
सचिव : श्री.संजय कडलग
सन्मा.संचालक मंडळ

**प्राथ व माध्यमिक आश्रमशाळा, कोथळे**
ता.अकोले, जि.अहमदनगर
सौ.बोडके मंजुषा बबन (प्राथ)
श्री.भांगरे पांडुरंग शिवराम (माध्य)
अधिक्षक, शिक्षक व कर्मचारी

**मा.मधुकरराव पिचड माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, राजूर**
ता.अकोले, जि.अहमदनगर
श्री.कैलास गेणुजी तेलोरे
प्राचार्य
सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वृंद

**इंदिरा गांधी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, वारंघुशी**
ता.अकोले, जि.अहमदनगर
सौ.सुरेखाताई विजय खिलारी
मुख्याध्यापक
सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी

**माध्यमिक आश्रमशाळा, चिंचावणे**
ता.अकोले, जि.अहमदनगर
मुख्याध्यापक
श्री.खाडे आर. डी.
अधिक्षक, शिक्षक व कर्मचारी



स्व. श्री. मधुकरराव पिचड
कार्यकारी विश्वस्त

अमृतसागर दुध संघाचे चेअरमन, महानंद दुध संघ मुंबईचे संचालक,
अकोले तालुका एज्युकेशन संस्थेचे कायम विश्वस्त, मा.विधानसभा सदस्य

# मा.आ.श्री.वैभवराव पिचड साहेब

यांना वाढदिवसानिमित्त

हार्दिक शुभेच्छा





'भाऊ'
शतायुषी व्हा!

|| साहसे श्री: प्रतिवसति ||

## अकोले तालुका एज्युकेशन सोसायटी, अकोले

ता.अकोले, जि.अहमदनगर



मा.श्री.गिरीजाजी जाधव
(कायम विश्वस्त)

मा.श्री.मधुकरराव सोनवणे
स्वीकृत विश्वस्त

मा.श्री.संपतराव वैद्य
स्वीकृत विश्वस्त

मा.श्री.सुरेशराव कोते
स्वीकृत विश्वस्त



मा.श्री.धनंजय संत
खजिनदार



मा.श्री.सुधाकर देशमुख
सेक्रेटरी



मा.श्री.सुनिल दातीर
अध्यक्ष

### * शैक्षणिक विस्तार *

■ अगस्ति कला, वाणिज्य आणि दादासाहेब रुपवते विज्ञान महाविद्यालय, अकोले ■ औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अकोले ■ आम्लेश्वर विद्यालय, आंभोळ ■ छत्रपती शिवाजी महाराज विद्यालय, मेहेंदुरी ■ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, शेंडी (भंडारदरा) ■ भैरवनाथ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, चास ■ कन्या विद्या मंदिर, अकोले ■ सरस्वती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, धामणगाव पाट ■ शेषनारायण विद्यालय, कुंभेफळ ■ संत ज्ञानेश्वर विद्यालय, ढोकरी ■ भारतरत्न राजीव गांधी विद्यालय, धामणगाव आवारी ■ ह.भ.प. सावित्रीआई विद्यालय, विठे ■ कला, वाणिज्य वरीष्ठ महाविद्यालय, शेंडी (भंडारदरा) ■ संत कोंडाजी वरिष्ठ महाविद्यालय, कोतुळ ■ कला, वाणिज्य वरिष्ठ महाविद्यालय, समशेरपूर ■ एम. बी.ए/एम.सी.ए कॉलेज, अकोले ■ फॅकल्टी ऑफ पॉलिटेक्निक कॉलेज, अकोले ■ परफेक्ट इंग्लिश मिडीयम स्कुल, अकोले ■ यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक - अभ्यासकेंद्र

शुभेच्छुक : मा. विश्वस्त, पदाधिकारी, कार्यकारिणी सदस्य, सभासद, मा. प्राचार्य, उपप्राचार्य, मुख्याध्यापक, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर, कर्मचारी वृंद, विद्यार्थी, विद्यार्थिनी व पालक वर्ग.

### सन्माननीय कार्यकारिणी सदस्य

अताएसो कार्यकारिणीतील सन्माननीय पदाधिकारी

मा. डॉ. दामोधर कारभारी सहाणे (सदस्य)
मा. श्री. यशवंतराव दशरथ आभाळे (सदस्य)
मा. ॲड. आनंदराव निवृत्ती नवले (सदस्य)
मा. श्रीमती कल्पनाताई अजित सुरपुरिया (सदस्य)
मा. श्री. सुधाकरराव काशिनाथ आरोटे (सदस्य)
मा. श्री. रमेशराव हरिभाऊ जगताप (सदस्य)
मा. श्री. शरदराव विश्वासराव देशमुख (सदस्य)
मा. श्री. मच्छिंद्रराव पांडुरंग धुमाळ (सदस्य)
मा. श्री. संपतराव पांडुरंग मालुंजकर (शिक्षणाधिकारी)

## अमृतसागर

सहकारी दूध व्यावसायिक व प्रक्रिया संघ मर्या;
अकोले, ता.अकोले, जि.अहमदनगर

## || अभिष्टचिंतन ||

भाऊ म्हणजे हिऱ्यास लाभलेले सुवर्ण कोंदण, संस्कृती, कला, धार्मिक भक्तीभाव, समाजकारण, राजकारण, राष्ट्र अस्मिता आदि विविध पैलूंनी सातत्याने झळकणारे व्यक्तिमत्व..



मा.श्री.रावसाहेब रामराव वाकचौरे
(व्हा.चेअरमन)



मा.श्री.दादाभाऊ गणपत सावंत
(कार्यकारी संचालक)

आमच्या संस्थेचे चेअरमन
**मा.श्री.वैभवराव पिचड**
यांना वाढदिवसानिमित
हार्दिक शुभेच्छा!



मा.आ.श्री. वैभवराव मधुकरराव पिचड
(चेअरमन)

### सन्माननीय संचालक मंडळ

श्री.आनंदराव वाकचौरे, श्री.आप्पासाहेब आवारी, श्री.रामदास आंबरे, श्री.जगनशेठ देशमुख, श्री.अरुण गायकर, श्री.गंगाधर नाईकवाडी, श्री.सुभाष डोंगरे, श्री.बाबुराव बेणके, श्री.गोरक्ष मालुंजकर, श्री.शरदराव चौधरी, सौ.अश्विनी धुमाळ, सौ.सुलोचना औटी

दुध अगस्तीचे...
आरोग्य कुटूंबाचे
पाश्चराईज्ड व होमोनाईज्ड दूध




आमची खालील दर्जेदार, शुद्ध व सकस उत्पादने 'अगस्ति' ब्रॅण्डनेमने सर्वदूर विक्रीस उपलब्ध आहेत.




गायीचे शुद्ध व सकस अगस्ति तूप ● निर्भेळ, निर्जंतुक, पाश्चराईज अगस्ति दूध ● दही ● लस्सी ● ताक ● श्रीखंड ● आम्रखंड ● पेढा ● खवा ● मलई ● पनीर

# संपादकीय



## बालाकोटच्याही पुढे

'पहलगाम येथे निष्पाप पर्यटकांच्या हत्येला जबाबदार असलेला प्रत्येक दहशतवादी आणि त्याला आश्रय देणाऱ्याला भारत शोधून काढून शिक्षा करील', असे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, तेव्हा पाकिस्तानला तो अगदी स्पष्ट शब्दात इशारा होता. गुळमुळीत शाब्दिक खेळ हा मोदींचा स्वभाव नव्हे. यावेळी कोणाला कल्पनाही करता येणार नाही, अशी काही कारवाई ते करतील आणि पाकिस्तानच्या मर्मावरच नेमका आघात होईल, हे निश्चित आहे. जम्मू आणि काश्मीरमध्ये सैन्यदले आणि प्रशासनाने अनेक चुका केल्या, हे अमान्य करताच येणार नाही. गेल्या ३५ वर्षांत दहशतवाद्यांकडून कधीही पर्यटकांवर हल्ला झालेला नाही. त्यामुळे 'असे काही घडणारच नाही', हे जणू गृहीतच धरले गेले. 'यावेळी पर्यटनस्थळे लक्ष्य होऊ शकतात', असा इशारा गुप्तचरांनी देऊनही हे क्रूर हत्याकांड घडले.

पहलगाममधील बैसरन परिसर मिनी स्वित्झर्लंड असूनही तिथे पर्यटन सेवा देणाऱ्यांसाठी साध्या परवान्याची पद्धतही नाही. हजारो पर्यटकांना घेऊन कुणीही कुणाच्याही परवानगीशिवाय कुठेही जावे, असे चालले होते. आता तेच दहशतवाद्यांचे सोपे लक्ष्य ठरले आहे. पुलवामात १४ फेब्रुवारी २०१९ रोजी आत्मघातकी बॉम्बर्सनी सीआरपीएफ जवानांच्या बसवर केलेल्या हल्ल्यात ४० जवान ठार झाले होते. यासंदर्भातील डावपेचात्मक बाबी हाताळणाऱ्यांचे मत असे की, पहलगाम म्हणजे पुलवामा नव्हे. भारतीय सैन्याने त्या हल्ल्याचा सूड म्हणून पाकिस्तानमधील बालाकोटवर अचानक हवाई हल्ला करून दहशतवाद्यांचे तळ उद्ध्वस्त केले. यावेळी भारत बालाकोटच्या पुढे जाईल आणि पाकिस्तानविरुद्ध दीर्घ युद्ध पुकारेल, अशी चर्चा आहे. २०१९ मध्ये मोदी निवडणुकीच्या तणावाखाली होते. लोकसभा निवडणुका दोन महिन्यांवर होत्या. विरोधी पक्षांनी सुरक्षेत गलथानपणा झाल्याचा ठपका ठेवला होता, परंतु आज २०२५ मध्ये विरोधी पक्षही मोदींच्या ठामपणे पाठीशी आहेत. सिंधू जल करार स्थगित करून भारत सरकारने पाकिस्तानविरुद्ध आर्थिक युद्ध पुकारले आहे. पुढच्या दोन आठवड्यांत आणखी कठोर पावले उचलली जातील, असे अंतस्थ सूत्रांकडून समजते. बिहार विधानसभेच्या २४३ पैकी २०० जागा राष्ट्रीय लोकशाही आघाडी जिंकेल, असे भाजपचे म्हणणे आहे. विरोधी पक्षांमधील प्रमुख नेते आपल्या छावणीत आणण्याचाही पक्षाचा प्रयत्न चालला आहे. अलीकडेच एक केंद्रीय मंत्री काँग्रेसचे राज्यसभेतील खासदार अखिलेश प्रसाद सिंह यांना भेटले. अखिलेश प्रसाद यांची बिहार प्रदेश काँग्रेसच्या अध्यक्षपदावरून उचलबांगडी होताच नेमकी संधी साधण्यासाठी भाजप लगेच पुढे सरसावला. 'पक्षात चांगले भवितव्य असेल. राज्यसभेतील खासदारकीही पुन्हा मिळेल', असे आमिष दाखवण्यात आले. तूर्तास तरी अखिलेश प्रसाद सिंह यांनी याविषयी फारशी उत्सुकता दाखवलेली नाही. राष्ट्रीय जनता दल आणि इतर पक्षातले काही प्रमुख नेते आपल्या छावणीत आणण्याचे प्रयत्नही भाजपने चालविले आहेत.

# सुसंस्कृत, सोज्वळ, अभ्यासू व्यक्तिमत्व : माजी आमदार वैभवराव पिचड

**शब्दांकन : डॉ. विश्वासराव आरोटे, संपादक**

(समर्थ गांवकरी)



अहमदनगर जिल्ह्यासह मराठवाड्याला पाणी पुरविणारा तालुका, आदिवासी दूर्गम तालुका, संगमनेरचा धाकटा भाऊ आणि सर्वात महत्वाचे देशभरात पिचड साहेबांचा अकोले तालुका अशी ओळख असणाऱ्या अकोल्याचे विधानसभेत प्रतिनिधीत्व केलेल्या सुसंस्कृत, सोज्वळ, युवा पण अभ्यासू व वडीलधाऱ्यांचा मान ठेवणारा तर तरुणांच्या गळ्यातील ताईत असा समाजशील चेहरा असणारे अकोले तालुक्याचे नेतृत्व म्हणजे माजी आमदार वैभवराव पिचड। आज त्यांचा वाढदिवस व वाढदिवसाचे औचित्य साधून त्यांच्या व्यक्तीमत्वाचा उहापोह यानिमित्ताने।

खरं तर मान, सन्मान, प्रतिष्ठा, प्रसिध्दी याचा कधीही हव्यास नसलेल्या या युवा नेतृत्वाने आजपर्यंत कधीच आपला वाढदिवस जल्लोषात मोठ्या दिमाखात साजरा केला नाही. ते त्यांना आवडतही नाही पण मित्र परिवार कुटुंब व कार्यकर्त्यांच्या मानसिकतेचा विचार करुन फक्त शुभेच्छा स्विकारने इतकेच स्वरुप या कार्यक्र माचे असते. आजही कोविडच्या पार्श्वभूमीवर कोणतेही सोपस्कार होणार नाहीत, जे जनतेचे दुःख तेच माझे दुःख हा विचार आपल्या कार्यकर्त्यांना देणारे युवा नेतृत्व म्हणजे वैभवराव पिचड,

२०१४ च्या विधानसभा निवडणूकीत माजी मंत्री पिचड साहेबांचे राजकीय वारसदार म्हणून त्यांनी अकोले विधानसभेची निवडणूक लढविली, ती प्रचंड मताधिक्याने जिंकली व विधानसभेत ज्या युवा आमदारांची फळी उभी टाकली होती, त्यातील संयमी, शांत पण प्रश्नांसाठी तितकेच आक्रमक व अभ्यासू आमदार म्हणून आपला ठसा उमटवून गेले. विधानसभेतील त्यांची कारकीर्द संस्मरणीय ठरली ती माजी मंत्री मधुकररावजी पिचड यांचा मुलगा म्हणून नाही तर माजी मंत्री पिचडांच्या तालमित तयार झालेल्या खऱ्या, हुशार, अभ्यासू, सुसंस्कृत व आपल्या मतदार संघातील जनतेच्या प्रश्नांसाठी भांडणारे कर्तुत्ववान युवा विधानसभा सदस्य म्हणून। आपले प्रश्न मांडण्याची व ते सोडवून घेण्याची कला, प्रशासकीय ज्ञान व यंत्रणेवरील वचक यामुळे त्यांची कारकीर्द उल्लेखनीय ठरली. त्यावेळी महाराष्ट्रात सेना-भाजप युतीचे सरकार असुनही आपल्या कामाच्या पध्दतीमुळे विरोधी सदस्य असूनही आपल्या मतदार संघात विकासकामांचा खंड पडू दिला नाही.

अहमदनगर जिल्हा सहकारी बँक संचालक, जिल्हा परिषद सदस्य, अमृतसागर दूध संघाचे चेअरमन म्हणून त्यांची कारकिर्द वाखणण्याजोगीच आहे. अमृतसागर दूध संघाच्या माध्यमातून तालुक्यातील दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या हिताचे अनेक निर्णय घेतले. सर्वाधिक रिबेट देऊन उत्पादकांची दिवाळी नेहमीच गोड केली आहे. अनावश्यक सर्वच खर्चांना फाटा देऊन दूध संघ लाखो रुपयांनी नफ्यात ठेवण्यात ते यशस्वी झाले आहेत.

आपले संघटन, युवकांमध्ये 'भाऊं बद्दल असलेली सकारात्मक प्रतिमा तालुक्याचे प्रतिनिधीत्व करत नसतानाही पायाला भिंगरी बांधून तालुक्याचे करत असलेले भ्रमण, प्रत्येकाच्या सुख दुःखात सहभागी होऊन दाखवित असलेली सामाजिक बांधिलकी यामुळे वैभव पिचड हे तालुक्यातील जनतेला आपले वाटतात. आदिवासी समाज बांधव व त्यांच्याप्रती असलेली आपली बांधिलकी ते कधीच विसरत नाहीत. अखिल भारतीय आदिवासी परिषदेच्या माध्यमातून आदिवासींसाठी माजी मंत्री मधुकरराव पिचड यांच्या कार्यात ते त्यांच्या खांद्याला खांदा देऊन काम करत आहेत. आदिवासींच्या प्रश्नावर हा सोज्वळ व संयमशील नेता वेळप्रसंगी आक्रमक देखील होताना बघितला आहे. आज ते भाजपाचे सक्रीय नेतृत्व करत असून त्यांची आदिवासी समाजाप्रती असलेली कणव तळमळ व त्यांच्या प्रश्नावर काम करण्याची उमेद बघून पक्षाने त्यांची भारतीय जनता पक्ष अनुसूचित जमाती समितीच्या राष्ट्रीय मंत्री या पदी नियुक्ती करुन देश पातळीवर आदिवासींच्या प्रश्नावर व त्यांच्या उत्कर्षासाठी काम करण्याची संधी दिली आहे. खऱ्या अर्थाने अकोल्यातील आदिवासींचा हा गौरवच असून तालुक्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा असल्याची भावना आहे. आदिवासींसह अकोलेकरांचा मान, अभिमान व स्वाभिमान असलेल्या अकोलेकरांच्या वैभवास जन्मदिनाच्या लाख लाख शुभेच्छा।

# नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण कार्यशाळेचे आयोजन

पाथर्डी : (समर्थ गांवकरी)

पार्थ विद्या प्रसारक मंडळाच्या हीरक महोत्सवी वर्षानिमित्त बाबुजी आव्हाड महाविद्यालयामध्ये सोमवार दिनांक २८ एप्रिल २०२५ रोजी एक दिवशीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेमध्ये पाथर्डी तालुक्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य, मुख्याध्यापक आणि शिक्षक यांचा सहभाग असणार आहे. कार्यशाळेच्या निमित्ताने नवीन शैक्षणिक धोरणातील बदल तसेच माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेला लागू होत असलेले धोरण याविषयी चर्चा करण्यात येणार आहे.




कार्यशाळेचे उद्घाटन पाथर्डी पंचायत समितीचे गट विकास अधिकारी शिवाजी कांबळे यांच्या शुभहस्ते व पार्थ विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अभय आव्हाड यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. सदर कार्यशाळेत तज्ञ व्यक्तींची व्याख्याने होणार आहेत, त्यामध्ये नवीन शैक्षणिक धोरणामध्ये भारतीय ज्ञान परंपरेचा इतिहास या विषयावर ह. भ. प. गणेश महाराज बडे यांचे व्याख्यान होणार आहे. त्याचबरोबर माध्यमिक विभागाच्या शिक्षकांसाठी न्यू आर्ट्स सायन्स अँड कॉमर्स महाविद्यालयाचे वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. मंगेश वाघमारे यांचे व्याख्यान होणार आहे. तसेच उच्च माध्यमिक विद्यालयातील शिक्षकांसाठी डॉ. जयश्री खेडकर यांचे व्याख्यान होणार आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील बदलते प्रवाह या विषयाचा उहापोह या कार्यशाळेत होणार आहे. संपूर्ण पाथर्डी तालुक्यातील सर्वच माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील प्राचार्य, मुख्याध्यापक आणि शिक्षक यांचा सहभाग या कार्यशाळेत असणार आहे.

या कार्यशाळेत अधिकाधिक शिक्षकांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन बाबुजी आव्हाड महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बबन चौरे व राष्ट्रीय शैक्षणिक धोरणचे महाविद्यालय समन्वयक डॉ. अशोक कानडे यांनी केले आहे.

# जुन्नर एसटी स्टँड समोर अपघात

शिवनेरी : (समर्थ गांवकरी)

किल्ले शिवनेरीच्या पायथ्याशी असलेले जुन्नर एसटी स्टँड समोर अपघाताचे प्रमाण सातत्याने वाढत असल्याने पर्यटक व नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण पसरलेले आहे. यामुळे येथील रहदारी वाहतूक नियंत्रण आणण्यासाठी ट्राफिक पोलिसांचा बंदोबस्त ची मागणी सातत्याने करण्यात येत आहे . महाराष्ट्र शासनाने तालुका पर्यटन घोषित केल्यामुळे राज्यातून पर्यटकांची संख्या जास्त पाहावयास मिळत आहे . शिवनेरी किल्ला , दार्या घाट , चावंड किल्ला , अष्टविनायकापैकी तीर्थक्षेत्र ओझर व लेण्याद्री देवस्थान, कुकडेश्वर मंदिर , येडगाव , वडज माणिक डोह ,पिंपळगाव जोगा , चिल्हेवाडी सर्व धरण क्षेत्र , हटकेश्वर , रेडा समाधी , लेण्या , इतिहासकालीन मंदिर व इतर पर्यटन स्थळ पाहण्यासाठी पर्यटकांची गर्दी जुन्नर बस स्थानक येथे सातत्याने पहावयास मिळत आहे . जुन्नर एसटी स्टँड बसस्थानका जवळ कृषी उत्पन्न बाजार समिती , पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक , श्री शिवछत्रपती महाविद्यालय , पंचायत समिती कार्यालय , तहसील कार्यालय , पोस्ट ऑफिस , भूमी अभिलेख कार्यालय, महसूल विभाग, वनविभाग कार्यालय, होमगार्ड कार्यालय, जुन्नर पोलीस स्टेशन, उपविभागीय पोलीस कार्यालय, न्यायालय , दूरध्वनी केंद्र, खरेदी विक्री बाजार, खरेदी विक्री संघ , बँका व इतर नागरिक तसेच शेतकऱ्यांच्या जीवनाशी संबंधित सर्व विविध कार्यालय एसटी बस स्थानकाच्या जवळच असल्याने मोठ्या प्रमाणात गर्दी होऊन वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे .
























हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, अॅड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# संघर्षशील विकासाभिमुख नेतृत्व - वैभवराव पिचड

: (समर्थ गांवकरी)



सत्तेवर असताना सत्तेच्या माध्यमातून विकास योजना राबविण्यासाठी सतत आग्रही भूमिका घेणाऱ्या माजी आमदार वैभवराव पिचड यांनी सत्ता नसताना विकासाच्या प्रश्नांवर, जनतेच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांवर संघर्षाची भूमिका तेवढ्यात ताकतीने पार पाडली आहे,पार पाडत आहेत. विकास आणि संघर्ष या दोन्ही भूमिका सहजतेने पार पाडणारे असे राजकीय नेतृत्व तसे दुर्मिळच म्हणावे लागेल .

गत दोन पंच वार्षिक झालेल्या विधानसभा निवडणुकीत वैभव पिचड याना धक्कादायक पराभव स्वीकारावा लागला. राज्यातही विरोधी पक्षांचे सरकार आले .पण या पराभवाने ते खचले नाहीत .एक जबाबदार विरोधी पक्ष नेत्यांची भूमिका ते सक्षमपणे तालुक्यात बजावत आहेत.राज्य यंत्रणेला जागे करण्यासाठी वेळोवेळी सरकार बरोबर केलेला पत्रव्यवहार असो की प्रसंगी जनतेला भेडसावणाऱ्या लहान मोठ्या प्रश्नांवर रस्त्यावर उतरून केलेला संघर्ष असो,यातून दिसत आहे ती जनहीताची तळमळ .अलीकडेच त्यांचे अनेक जेष्ठ सहकारी त्यांना सोडून सत्ताधारी पक्षात गेले .पण या राजकीय वावटळीतही ते ठाम पणे उभे आहेत .कार्यकर्त्यांना धीर देत विचलित न होता ताकदीने उभे राहण्याचे आवाहन त्यांनी आपल्या कार्यकर्त्यांना केले .त्यांच्या या भूमिकेमुळे विधानसभा निवडणुकीत त्यांचेवर नाराज असणारी तरुणाई पुन्हा त्याच्या जवळ येऊ लागली आहे .गावोगाव त्यांचे उत्स्फूर्त स्वागत होऊ लागले आहे.

म्हणतात ना, मोठ्या झाडाखाली लहान झाड वाढत नाही. पण त्याला अपवाद ठरले माजी आमदार वैभवराव पिचड..

नम्र स्वभाव,अंगी सुसंस्कृतपणा, मात्र अन्यायाविरुद्ध लढा देणारा म्हणून त्यांनी आपली ओळख संपूर्ण तालुक्यालाच नव्हे तर राज्याला करून दिली.

2014 साली झालेल्या विधानसभा निवडणुकीत आमदार म्हणून निवडून आले मात्र राज्यात सत्ता नसल्याने साडे चार वर्षे तालुक्याच्या विकासासाठी संघर्ष करावा लागला. जवळपास 150 आंदोलने, मोर्चे, उपोषणे, निवेदने देऊन त्यांनी विरोधी आमदार म्हणून तालुक्याची खिंड लढविली.दुदैव असे की त्यांना राज्य पातळीवरून कोणताही साथ मिळाला नाही. राज्यात भाजप सेना युतीचे सरकार येणार अशी परिस्थिती तेव्हा तयार झाली होती.तालुक्यात विकासाच्या कल्पना व योजना मोठ्या प्रमाणात मात्र कोणतेही ठोस कामे उभे राहत नव्हते. राष्ट्रवादी व काँग्रेस चे सरकार येईन अशी शक्यता नव्हती. अशा परिस्थितीत तालुक्याचा विकास कसा करायचा असा यक्ष प्रश्न समोर होता.त्यावेळी अनेकांनी भाजप मध्ये जाण्याचा सल्ला दिला, शिवसेनेनेही ऑफर दिली होती,मात्र सर्वांच्या विचाराने राष्ट्रीय पक्ष म्हणून भाजपमध्ये प्रवेश केला. तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मोठ्या उत्साहात व सन्मानाने त्यांचे स्वागत केले. आणि तालुक्यातील अनेक प्रश्न प्रवेशा नंतर च्या तीन महिन्यात मार्गी लावले. राज्यात 2019 चे निकाल हाती आले तेव्हा शिवसेना व भाजप चे आमदार सर्वात जास्त निवडून आले. मात्र राजकारणात महत्वकांक्षा मोठ्या असल्याने शिवसेना भाजपाबरोबर राहिली नाही. तसेच तालुक्यात ही निवडणुकीत पराभवाला सामोरे जावे लागले. मात्र पराभव पचनी पडून न खचता, न डगमगता तालुक्यासाठी पुन्हा एकदा संघर्ष सुरू केला. करोनाच्या काळात तालुक्यात अनेक सामाजिक उपक्रमातून रुग्णांना, गरिबांना, आदिवासी बांधवाना मदत केली.त्यांच्या विविध प्रश्नांवर पत्रव्यवहार करून मंत्री महोदयांना निर्णय घेण्यास भाग पाडले. जे काम विद्यमान आमदाराने करणे गरजेचे असताना ती कामे माजी आमदार पिचड यांनी मार्गी लावली. तालुक्याच्या दृष्टीने जी विकास कामे प्रलंबित आहे,होणे गरजेचे आहे त्याबाबत मुख्यमंत्री, राज्यपाल, विरोधी पक्षनेते, संबंधित विभागाचे मंत्री,सचिव,जिल्हाधिकारी, तहसीलदार, इतर विभागाचे प्रमुख अधिकारी यांचे कडे पत्रव्यवहार करून सातत्याने पाठपुरावा चालू ठेवला. त्यांच्या या धडपडी मुळे जनतेमध्ये त्यांचे बद्दल ची आपुलकी वाढत चालल्याचे दिसत आहे. त्यांच्या संघर्षाची व आदिवासी समाजासाठी असलेली तळमळ पाहून भाजप पक्षनेतृत्वाने त्यांना राष्ट्रीय पातळीवर काम करण्याची संधी देण्याच्या दृष्टीने भाजप अनुसूचित जनजाती मोर्चाच्या राष्ट्रीय मंत्री म्हणून नियुक्ती करून त्यांचा सन्मान केला. भाजपच्या कारकिर्दीत पहिल्याच वेळी राष्ट्रीय पातळीवर काम करण्यास संधी मिळणारे पिचड हे एकमेव अपवाद असतील.

त्यांच्या वर एका राज्याच्या विधानसभा निवडणुकीत निरीक्षक पदाची जबाबदारी येणार होती,मात्र पिचड यांनी भाजप ची कार्यप्रणाली, विचारधारा समजून घेऊन मला काम करू द्या, असे म्हणत मोठी संधी त्यांनी नम्रपणे नाकारली. दिल्ली येथील पक्षाच्या पहिल्याच मिटिंग मध्ये त्यांनी आपल्या कामाची वेगळी छाप पाडली.त्यांनी आपली निवड सार्थ ठरविली आहे.

तालुक्यातील राजकीय घडामोडी त्यांना त्रासदायक ठरतात की,अशी शंका सर्व सामान्य जनतेच्या मनात येत होती.मात्र ज्यांनी साथ सोडली ते पाहून वैभवराव पिचड यांनी सर्व जिवाभावाच्या कार्यकर्त्यांना धीर दिला.मी खंबीर आहे.असा विश्वास दिला. व पहाता पहाता तरुणाई ने त्यांना साथ देण्याचा निर्णय घेतला. आणि गावोगावचे युवक, महिला यांनी प्रत्यक्ष भेट घेऊन आम्हीं तुमच्या बरोबर आहोत असा पाठींबा दिला.

तालुक्यात भाजप पक्ष रुजनार नाही अशी चर्चा होत असताना प्रत्यक्षात मात्र वेगळेच चित्र दिसायला लागले.जे सोडून गेले त्यांची जागा भरून काढण्यासाठी नवीन युवक एकत्र आले. आणि गावागावात भाजपच्या शाखा सुरू व्हायला लागल्या.नवीन जोश भाजप कार्यकर्त्यांनी आणला. त्यांचे नेत्तुत्व मान्य करीत असल्याचे वातावरण तालुक्यातील जनता पाहू लागली.विरोधकावर टीका करताना कधी पातळी सोडून बोलले नाही.मोठ्यांना सन्मानाने वागणूक देणे ही त्यांना त्यांच्या आई वडिला कडून मिळालेली शिकवण जनतेला दिसू लागली. सर्व कार्यकर्त्यांना मानाने वागणूक देणारे नेत्तुत्व त्यांच्या रूपाने तरुणांना आकर्षित करू लागल्याचे चित्र दिसत आहे.40 वर्षे काय विकास केला ही जनता विसरली नाही मात्र विरोधी नेते जाणून बुजून राजकारण करत आहेत. हे आता जनतेला हळुहळू कळायला लागले. हे मात्र नक्की, व पुन्हा एकदा तालुक्यात पिचड यांच्या रूपाने आमदार म्हनुन जनता त्यांना विजयश्री मिळवून देईल व पुन्हा नव्या उत्साहात विकास कामासाठी तालुक्यात 'वैभवपर्व' सुरू होईल असा विश्वास भाजपचे कार्यकर्ते व पिचड समर्थक व्यक्त करत आहेत.

**शब्दांकन : डॉ विश्वासराव आरोटे राज्य सरचिटणीस महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई तथा संपादक दैनिक समर्थ गांवकरी**

## मा. आमदार वैभवराव भाऊ पिचड

### शांत, संयमी, मितभाषी, कणखर, कल्पक, चारित्र्यसंपन्न आणि अभ्यासू नेतृत्व

(समर्थ गांवकरी)



महाराष्ट्र विधानसभेच्या २८८ जागांपैकी २५ जागांवर अनुसूचित जमाती चे आरक्षण आहे. त्यापैकी अहमदनगर जिल्ह्यातील अकोले विधानसभा मतदारसंघातील लोकप्रतीनिधी मा.मधुकरराव पिचड साहेब हे आदिवासी नेते म्हणून अकोले मतदारसंघात सदैव प्रभावशाली राहिले आहे आदिवासींचा विकास करताना शिक्षणाच्या मूलभूत सोयी सुविधा,मुलांचे आरोग्य, त्यांना देण्यात येणाऱ्या सुविधा, मुलीं महिला सुरक्षितता, पेसा कायद्यांतर्गत शासनाच्या प्रत्येक खात्यात केवळ आदिवासी शिक्षित युवकांची नोकर भरती, दुर्गम भागात दळणवळणाची साधणे आणि पक्के रस्ते, पाझर तलाव, शेततळी, लघुपाटबंधारे बांधून पिण्याचा आणि शेती सिंचनाचा प्रश्न, वाड्या -पाड्यावर, हाकेच्या अंतरावर किमान प्राथमिक दवाखाना,प्राथमिक शाळा, शेती विकासाच्या योजना आदी कार्याला प्रथम प्राधान्य दिले,

आदिवासी बांधवासाठी काही करण्याची इच्छा असते, परंतु पक्षप्रमुखांच्या मर्जीपुढे जाता येत नाही. अर्थात स्वाभिमानी लोकप्रतिनिधी असतात. त्यात मधुकरराव पिचड अग्रणी आहेत. २००२ साली त्यांनी जात पडताळणी कायदा करून खऱ्या आदिवासींचे मूळतः संरक्षण केले आहे आणी बोगस आदिवासी हुडकून काढले. व मुळ आदिवासीना न्याय मिळवून दिला. हा एक मोठा ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला होता.

आदिवासी लोकप्रतिनिधीं म्हणून अत्यंत जागृत राहून समाजाच्या प्रति असलेली नाळ जोडून ठेवणारे माजी आदिवासी विकास मंत्री मधुकरराव पिचड साहेब अकोले मतदारसंघा सह संपूर्ण राज्यात आदिवासीचें प्रभावी नेते म्हणून ओळख निर्माण झाली आहे त्याचे कारणही तसेच आहे.नुसतेच आदिवासी नेते नव्हे तर सर्वच थरातील जात, पात, धर्म, वंश अशा कोणत्याच भेदभावाला थारा न देता आपल्या सत्ताकाळात सुशासनाचा आदर्श मांडला.

लोकप्रतिनिधी म्हणून काम करताना आजपर्यंतच्या पिचड कुटुंबातील राजकीय जीवनात मतदार संघ व राज्यातील इतर घटकाबरोबर कधीच भेदभाव दिसला नाही. म्हणूनच अठरा पगड जातीचे वर्चस्व असणाऱ्या अकोले मतदार संघातून पस्तीस वर्षे जनसेवेची संधी मिळाली.

मा.मधुकर पिचड साहेबांच्या राजकीय सेवानिवृत्ती नंतर त्यांचे सुपुत्र युवा नेतृत्व मा.वैभवराव भाऊ पुढे आले आणि जनसेवेचे व्रत हाती घेतले.

शांत, संयमी, मितभाषी, कणखर, कल्पक, चारित्र्यसंपन्न आणि अभ्यासू नेतृत्व म्हणून मा.आमदार वैभवराव भाऊ यांचे नावलौकिक आहे. मा.मधुकरराव पिचड साहेबांच्या मार्गदर्शनाखाली पारदर्शक कारभार, कर्तव्यदक्ष, पक्ष संघटनेसाठी केलेले काम आणि सर्वात महत्वाची बाब म्हणजे स्वच्छ प्रतिमा आणि चारित्र्यसंपन्नता लाभलेले एक असामान्य नेतृत्व म्हणजेच मा.आमदार वैभवराव भाऊ होय.

सन २०१४ ला अकोले मतदारसंघाचे नेतृत्व हाती घेतले तेव्हाच दुरदृष्टीने झपाटुन काम करणारं गतिमान नेतृत्व म्हणुन कोहिनूर हिरा चकाकला. २०१४-१९ या कार्यकाळात भाऊ आमदार होते परंतु पक्ष सत्तेत नसल्याने मोठा संघर्ष करावा लागला राजकीय कारकिर्दीची सुरुवातच अशी झाली तरी न डगमगता अधिवेशन काळात सत्ताधारी पक्षाला मुद्देसूद आणी आभ्यासु ,अचुक प्रश्न मांडुन सभागृहाचे लक्ष वेधुन घेतले परिणामी सभापती महोदयांनी आमदारकी चे निलंबित करण्याचा ठराव पास केला.परंतु अचुक संयमी, स्पष्टवक्तेपणा,जनसेवेसाठी सदैव तत्पर असल्याने. निलबंन मागे घ्यावे लागले या घटनेतच खरा लोकप्रतिनिधी कसा असतो याचे मुर्तीमंत उदाहरण संपूर्ण महाराष्ट्राने पाहिले.

मा.वैभव भाऊ यांनी जेंव्हा पासुन मतदारसंघाची जबाबदारी स्विकारली आहे, त्या प्रत्येक जबाबदारीत सतत जागृत असणार नेतृत्व आणि कर्तृत्व यांच्यात पाहावयास मिळाले.

गेल्या वर्षभरात महाराष्ट्रातील आदिवासी समाजाच्या प्रश्नांवर आवाज उठवून सरकारला धारेवर धरीत खावटी कर्ज, रोजगार, स्वस्त धान्य, "मनरेगा' मार्फत रोजगार, आदिवासी संघटन, वीजबिल, ऑनलाइन शिक्षण, आदिवासींचे कुपोषण, पोषणआहार, वनजमिनी प्रश्न, शेतीला पाणी, उपसासिंचन योजना, आरक्षण अशा विविध प्रश्नांवर सडेतोड मत व्यक्त करीत सरकारला हे प्रश्न मार्गी लावण्यास भाग पाडले.भाऊंच्या कामाची दखल घेऊन भाजपच्या राष्ट्रीय नेत्यांनी महाराष्ट्रातून त्यांच्या कामाचा अहवाल घेत त्यांची अनुसूचित जमाती राष्ट्रीय मंत्री म्हणून नियुक्ती केली. राज्यातील आदिवासी समाजबांधवांच्या समस्या जाणणारा नेता म्हणुन भाऊंचा आवर्जुन उल्लेख करावा लागेल. कोणतेही काम हातात घेतांना, सुरु करतांना होणारे फायदे-तोटे, दुरगामी परिणाम यांचा विचार करुन सखोल अभ्यास करुन कामास सुरुवात करण्याची खास हातोटी भाऊ कडे आहे. याचा अनुभव अनेकदा अकोले मतदारसंघात पहायला मिळाला आहे.

सध्याच्या कोरोना काळात मतदारसंघातील आरोग्यविषयक समस्या राज्यपाल, मुख्यमंत्री, आरोग्यमंत्री यांच्याकडे सातत्याने मांडुन नागरिकांना सोयीसुविधा मिळवून देण्यासाठी आग्रही भूमिका घेत आहेत, राजुर, अकोले या ठिकाणी सुसज्ज कोविड सेंटर उभारणी स्वखर्च,प्रशासन, अगस्ती सहकारी साखर यांच्या माध्यमातून कोविड रुग्णांना दिलासा मिळत आहे.

वाढदिवसाच्या जाहिराती, बँनरबाजी,हार तुरे अशा अनावश्यक खर्चाला फाटा देऊन रक्तदान शिबिर, प्लाझ्मा दान करावा असे अवाहन केले आणी युवकांनी भरभरून प्रतिसाद देत आज हा सेवा दिन वाढदिवसाच्या निमित्ताने साजरा होत आहे.

खास आपल्या जन्मदिनानिमित्त हा लेखनप्रपंच...!

जीवनातला प्रत्येक क्षण आनंद घेऊन येवो,उजडणारा प्रत्येक दिवस जीवनात यश घेऊन येवो,

तुम्हाला तुमच्या आयुष्यात नवे पर्व, नवे लक्ष, आनंद, आरोग्य आणि भरगच्च यश लाभो.

तुमच्या आयुष्यातले क्षण हे तेजस्वी सूर्या सारखे प्रकाशमय होऊन जावो,

तुमचं तेज अकोले मतदारसंघासह संपूर्ण राज्यात ही निखळत जाव,तुमच्या यशस्वी जीवनात तुमचं यश, ज्ञान, आणि किर्ति वृद्धीगंत होत जावी.

कर्तुत्वाच्या प्रत्येक वळणावर तुमच्या व्यक्तिमत्वाचा ठसा उमटवा हीच आमची इच्छा.

तुमच्या विषयी हृदयात असणार प्रेम अगदी अतूट आणि जिव्हाळ्याच होत आहे.

भाऊ तुम्हाला वाढदिवसाच्या कोटी कोटी शुभेच्छा.

**- भाऊसाहेब वाकचौरे पाटील कळस**

## भारत-पाकिस्तान सिंधू जलसंधी : शांततेचा प्रवाह की संघर्षाचा उद्रेक?

(समर्थ गांवकरी)



**डॉ. विश्वासराव आरोटे कळसुबाई शिखरावरून**

"पाणी म्हणजे जीवन," ही म्हण जितकी सार्वत्रिक तितकीच भारत आणि पाकिस्तानच्या नात्याच्या संदर्भात खोल अर्थ असलेली आहे. दोन देशांच्या इतिहासात असे फार कमी क्षण आहेत जेव्हा शांततेची आशा आणि संघर्षाची भीती एकाच वेळी नद्यांच्या प्रवाहासोबत वाहत होती. आणि याच प्रवाहाचा मूळ आहे सिंधू जलसंधी.

१९६० मध्ये भारताचे तत्कालीन पंतप्रधान जवाहरलाल नेहरू आणि पाकिस्तानचे राष्ट्रपती अयुब खान यांनी कराचीमध्ये या ऐतिहासिक करारावर स्वाक्षरी केली. या कराराने भारताला सतलज, व्यास आणि रावी या पूर्व नद्यांचे संपूर्ण नियंत्रण दिले तर पाकिस्तानला सिंधू, झेलम आणि चिनाब या पश्चिमेकडील नद्यांवरील प्राथमिक हक्क बहाल केले.

या संधीच्या माध्यमातून, भारताने संयम दाखवून आपल्या जलसंपत्तीवर मर्यादित हक्क मान्य केले. अर्धशतकाहून अधिक काळ हा करार तग धरून राहिला आणि जागतिक पातळीवर आदर्श समजला गेला.

पण एप्रिल २०२५ मध्ये, पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्याने या संयमाच्या प्रवाहात जोरदार खळबळ उडवली. २६ निष्पाप भारतीय पर्यटकांच्या मृत्यूने भारत सरकारची सहनशक्ती संपुष्टात आली. आणि त्यामुळे, भारताने सिंधू जलसंधी निलंबित करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला.

पाकिस्तानसाठी हा निर्णय धक्कादायक आहे. कारण सिंधू, झेलम आणि चिनाब या नद्यांचे पाणी त्याच्या कृषी अर्थव्यवस्थेचा कणा आहे.

जर भारताने पाण्याचा प्रवाह थांबवला किंवा मोठ्या प्रमाणावर नियंत्रित केला, तर पाकिस्तानला भीषण जलसंकटाचा सामना करावा लागू शकतो.

सीमेवर आधीच तणाव वाढलेला आहे. दोन्ही देशांच्या सैन्यांमध्ये चकमकी सुरू आहेत. आंतरराष्ट्रीय समुदाय संयमाचे आवाहन करतो आहे, पण इतिहास सांगतो जेव्हा पाण्याचा तुटवडा होतो, तेव्हा रक्तही सहज सांडले जाते.

भारतासाठी हा निर्णय का महत्त्वाचा?

राष्ट्रीय सुरक्षा: पाणी पुरवठा सुरू ठेवून दहशतवादाला प्रोत्साहन देणाऱ्या देशावर दबाव आणणे ही भारताची रणनीती आहे.

राजकीय संदेश: भारत आता फक्त लष्करी ताकदीवर नव्हे, तर आर्थिक आणि जलनीतीवरही आपली भूमिका ठामपणे मांडतो आहे.

अंतरराष्ट्रीय मतप्रवाह: भारताने संयमाने ६० वर्षे करार पाळला, त्यामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताचा निर्णय जास्त न्याय्य ठरतो.

पाकिस्तानची स्थिती : पाकिस्तानने भारताच्या निर्णयाचा तीव्र निषेध केला आहे. त्याने जल युद्धाचा इशारा दिला आहे. पण वास्तविकता अशी आहे की, पाणी मिळाले नाही तर पाकिस्तानच्या शेतीला, अन्नसुरक्षेला आणि लोकसंख्येला भीषण धोका निर्माण होईल.

पुढचा मार्ग : भारत आणि पाकिस्तान दोघांसाठीच हा क्षण निर्णायक आहे. संवादाच्या वाटा खुल्या ठेवणं, शांतता राखणं अत्यावश्यक आहे. कारण पाणी फक्त जीवन नाही, तर भविष्यातील अस्तित्वाचा प्रश्न आहे.

जर वादाचा निचरा शांततेने झाला नाही, तर सिंधूच्या पाण्याबरोबरच अविश्वास, तणाव आणि संघर्षाचे वादळही वाहू लागेल. आणि त्याचा फटका केवळ या दोन देशांना नाही, तर संपूर्ण दक्षिण आशिया आणि जगभराला बसू शकतो.

## पाथर्डीत भव्य सायमल बुद्धिबळ स्पर्धेचे उद्घाटन

पाथर्डी : (समर्थ गांवकरी)



- **बुद्धिबळ मनाची एकाग्रता विकसीत करण्यासाठी अत्यंत आवश्यक-सौरभ ढाकणे**

बुद्धिबळ हा खेळ मानवी मनाची एकाग्रता वाढवण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. यामुळे अभ्यासातील गती देखील वाढू शकते व आपल्या भावी आयुष्यात आपल्या सर्वांगीण विकासासाठी याचा अत्यंत फायदा होऊ शकतो, असे प्रतिपादन सौरभ ढाकणे यांनी व्यक्त केले.आनंद चेस क्लब व श्री तिलोक जैन विद्यालय, पाथर्डी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित भव्य सायमल बुद्धिबळ स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. नुकत्याच लागलेल्या केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या निकालात त्यांनी राष्ट्रीय स्तरावर ६२८ क्रमांकाची रँक मिळवलेली आहे. त्या निमित्ताने त्यांचा सत्कार या कार्यक्रमा वेळी आयोजित करण्यात आला होता.या प्रसंगी ते विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना बोलत होते. यावेळी व्यासपीठावर तिलोक जैन विद्यालयाचे प्राचार्य अशोक दौंड,यशवंत बापट,डॉ. विनय कुचेरिया,डॉ.शिरीष जोशी, प्रज्वल आव्हाड, आतिश भावसार, भारत गाडेकर, सागर नलवडे, सचिन ढाकणे, महादेव खोटे या सह विविध मान्यवर उपस्थित होते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना बुद्धिबळ खेळामध्ये आवड निर्माण होण्यासाठी आनंद चेस क्लब व श्री तिलोक जैन विद्यालयाच्या माध्यमातून नेहमीच सतत वेगवेगळ्या प्रकारचे उपक्रम राबविण्यात येतात. त्या अनुषंगाने बुद्धिबळा मध्ये राष्ट्रीय स्तरावर महाराष्ट्राचे नेतृत्व करणारा विद्यार्थी प्रज्वल आव्हाड या बरोबर १०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांना बुद्धिबळ खेळण्याची संधी या सायमल बुद्धिबळ स्पर्धेच्या माध्यमातून उपलब्ध करून दिल्याबद्दल सर्वच मान्यवरांनी विशेष असे कौतुक केले.

या वेळी यशवंत बापट यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना प्रज्वल आव्हाड या बुद्धिबळपटू ने अतिशय प्रतिकूल परिस्थितीवर मात करीत पाथर्डी चे नाव देश पातळीवर गाजवले, शिवाय भविष्यातील युवा ग्रँडमास्टर बनवण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे नमूद केले. यावेळी अध्यक्षपदावरून बोलतांना प्राचार्य अशोक दौंड यांनी देखील या सर्व विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. त्याचबरोबर विद्यालय राबवत असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली.

## 'वेव्हज २०२५': माध्यम आणि मनोरंजन क्षेत्राच्या जागतिक परिवर्तनाचा प्रारंभ

(समर्थ गांवकरी)

देशातील माध्यम व मनोरंजन (Media & Entertainment) क्षेत्राच्या इतिहासातील सुवर्णक्षण ठरणाऱ्या 'WAVES 2025' या जागतिक परिषदेस मुंबईत भव्य सुरुवात होत आहे. १ मे रोजी, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते जिओ वर्ल्ड सेंटर, मुंबई येथे या ऐतिहासिक परिषदेचे उद्घाटन होणार आहे. यावेळी केंद्रीय माहिती व प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित राहणार आहेत. १ ते ४ मे दरम्यान होणारी ही परिषद भारत सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालय आणि महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली असून, माध्यम आणि मनोरंजन उद्योगाच्या भविष्यासाठी दिशादर्शक ठरणार आहे.

महाराष्ट्र – 'ग्लोबल क्रिएटर इकॉनॉमी' कडे वाटचाल : बॉलीवूड, टीव्ही आणि ओटीटी इंडस्ट्री यांचे केंद्रस्थान असलेली मुंबई भारताच्या मनोरंजन क्षेत्रात नेहमीच आघाडीवर राहिली आहे. आता याच मुंबईला आणि महाराष्ट्राला जागतिक स्तरावर 'क्रिएटर हब' म्हणून प्रतिष्ठा मिळवून देण्याचा महत्त्वाकांक्षी प्रयत्न 'WAVES 2025' च्या माध्यमातून होतो आहे. ऑस्कर, कान्स आणि दावोससारख्या जागतिक परिषदेच्या धर्तीवर प्रथमच भारतात अशी परिषद आयोजित होत असून, जगभरातील 100 पेक्षा अधिक देशांतील प्रतिनिधी यात सहभागी होणार आहेत.

माध्यम आणि मनोरंजन क्षेत्राला दिशा देणारा मंच

'WAVES 2025' ही परिषद केवळ भारतातीलच नव्हे तर जागतिक माध्यम व मनोरंजन (M&E) उद्योगाला एकत्र आणणारा, नवसृजनास चालना देणारा आणि गुंतवणुकीसाठी दरवाजे उघडणारा एक महत्त्वाचा मंच आहे. भारताचा समृद्ध सांस्कृतिक वारसा, तंत्रज्ञानातील कौशल्य आणि प्रतिभेचा संगम या परिषदेच्या केंद्रस्थानी असणार आहे.

या परिषदेतील एक विशेष आकर्षण 'WAVES बाजार'

'WAVES बाजार' – एक इंटरॅक्टिव्ह व्यावसायिक व्यासपीठ असून जिथे खरेदीदार आणि विक्रेते थेट संवाद साधू शकतात. नव्या प्रकल्पांची ओळख, सर्जनशील कल्पना, आणि गुंतवणुकीच्या संधी येथे उपलब्ध होतील. विशेषतः, श्रेणीआधारित शोध प्रणाली आणि सुरक्षित मेसेजिंग सुविधांमुळे व्यवहार अधिक प्रभावी आणि विश्वासार्ह ठरतील.

**परिषदेत काय असणार?**

१. परिषद सत्रे – जागतिक उद्योग नेते, विचारवंत आणि नवोन्मेषक विविध विषयांवर मार्गदर्शन करतील.
२. मीडिया मार्केटप्लेस – भारताच्या माध्यम व मनोरंजन (M&E) क्षेत्रातील वैविध्य, क्षमता आणि नवकल्पनांचे आकर्षक प्रदर्शन.
३. तंत्रज्ञान प्रदर्शन – नवीन तंत्रज्ञान आणि सर्जनशील प्रकल्पांचे लाईव्ह डेमो.
४. सांस्कृतिक कार्यक्रम – भारताच्या समृद्ध कलासंपदेची झलक दाखवणारे बहारदार कार्यक्रम.

माध्यम आणि मनोरंजन उद्योग सध्या मोठ्या परिवर्तनाच्या उंबरठ्यावर आहे. 'WAVES 2025' ही परिषद नव्या कल्पनांना दिशा देऊन, भारताला जागतिक M&E सुपरपॉवर बनवण्याचा पाया रचणार आहे. सर्जनशीलता, तंत्रज्ञान आणि धोरणात्मक भागीदारी यांचा मेळ घालून, भारताला 'ग्लोबल कंटेंट डेस्टिनेशन' बनवण्याचे स्वप्न या मंचाद्वारे प्रत्यक्षात उतरणार आहे. पंतप्रधान, केंद्रीय मंत्री आणि राज्याचे मुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत होणारी ही परिषद भारताच्या सृजनशील भविष्यासाठी नवी ऊर्जा आणि प्रेरणा देणारी ठरणार आहे.

**- वर्षा फडके-आंधळे, उपसंचालक (वृत्त)**